## सोयाबीनचे १९७ पोते चोरी, गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०४ जून**

घरामध्ये ठेवून असलेले सोयाबीनचे पाच लाख रुपये किमतीचे १९७ पोते चोरुन नेल्याची घटना शेगाव (कुंड) येथे उघडकीस आली, या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला,

शेगाव कुंड येथील कमलाकर पाटील ह. मु. मानेवाडा नागपूर यांनी २२ एकरात सोयाबीनची पेरणी केली होती, त्यांना १९७ पोते सोयाबीनचे उत्पादन झाले होते, घरीच त्यांनी सोयाबीन ठेवले होते, २० मार्च रोजी त्यांनी घराचा मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले, घरात प्रवेश करून बघितले असता पाच लाख रुपये किमतीचे सोयाबीनचे १९७ पोते दिसून आले नाही, त्यांनी २२ मार्च रोजी तक्रार केल्यानंतर पोलिसांनी प्रकरणाची चौकशी केली, चौकशीत शेतातील कामावर असलेला प्रभाकर वलकी रा. समुद्रपूर याने सोयाबीनचे पोते चोरी करुन विक्री केल्याचे पुढे आल्यानंतर याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला, पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# रेती ट्रॅक्टर जप्त केल्याने संतप्त युवकाने केला तहसील कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न





**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणघाट, दि. ०४जून**

एक महिन्यात सतत तिसऱ्यांदा वाळू भरलेला ट्रॅक्टर महसूल विभागाने जप्त केल्याने येथील छोटू दिलीप वानखेडे वय (३५) रा. माता मंदिर वार्ड येथील याने आज दुपारी १२ च्या दरम्यान तहसीलदार यांचे कार्यालयात डिझेल अंगावर घेऊन स्वतःला पेटवून घेण्याचा प्रयन्त केला परंतु कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखून त्यांच्या हातातील माचीस काढून फेकली व त्याला पोलिसांचे ताब्यात दिल्याने पुढील अनर्थ टळला.

यासंदर्भात छोटू वानखेडे याच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की, तो वर्षभरापासून ट्रॅक्टर चालवीत आहे. तो या ट्रॅक्टरमधून वाळूची ने आण करीत असतो.

हा ट्रॅक्टर महसूल विभाग सातत्याने पकडून मला मानसिक त्रास देत असल्याचा त्याचा आरोप आहे. काही विशिष्ट लोकांचे ट्रॅकटर त्वारत सोडण्यात येते मात्र माझे ट्रॅक्टर सोडण्यासाठी अधिकारी मुद्यामच त्रास देतात. मी बेरोजगार असून व्याजाने पैसे काढून ट्रॅक्टर घेतला परंतु अधिकारी माझ्यासारख्या गरीब युवकांवर अन्याय करीत असून या अन्याया विरुद्ध प्रशासन याचे लक्ष वेधण्यासाठी मी स्वतः आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला होता असे त्याने सांगितले.

तहसीलदार योगेश शिंदे हें कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. एकंदरीत या घटनेने शहरातील अवैध रेती व्यवसायाची चांगलीच चर्चा रंगलेली आहे.

### तहसीलदार यांचेकडून अहवाल मागविला

उपविभागीय अधिकारी आकाश अवथरे यांनी सांगितले की हीं घटना तहसीलदार यांच्या कक्षात घडलेली असल्याने त्यांच्याकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### प्रशासनातील भ्रष्टाचा-यांच्या त्रासाला कंटाळून छोट याने केला आत्मदहनाचा प्रयत्न

आत्मदहन करण्याचा प्रयत्न करणारा ट्रॅक्टर मालक छोटू वानखेडे हा गत एक वर्षापासुन ट्रॅक्टरच्या माध्यमातुन होणाऱ्या उत्पन्नावर आपला उदरनिर्वाह चालवितो. कधी कधी रेतीची सुध्दा वाहतुक करतो. याकरीता शासकीय कर्मचाऱ्याला हप्ता सुध्दा देत राहतो. हप्ता खाऊन सुध्दा बेईमान कर्मचारी त्याचा ट्रॅक्टर पकडून तहसील कचेरीत लावतात आणी सोडत सुध्दा नाही. मात्र याउलट बड्या राजकीय नेत्यांचे पायचाटु करणाऱ्या रेती सम्राट कार्यकर्त्यांना अभय देतात. त्यांचा १० चक्का असो किंवा सहा चक्का वाहन असो अथवा ट्रॉली असो सर्वांना मुक्त रेतीची वाहतुक करण्याची मुभा दिली जाते ती महसूल प्रशासनाकडून, एखाद्यावेळी त्यांचे वाहन पकडले तरी थातुर मातुर कारवाई करतात. तहसील प्रशासनातील या भ्रष्ट कर्मचाऱ्यांच्या त्रासाला कंटाळुन शेवटी छोटु वानखेडे याने आज बुधवार (ता.चार) तहसील कार्यालय गाठले आणी कार्यालयातच तहसीलदारांसमक्ष अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

### आत्महत्या करणे हा कायद्यात गुन्हा नाही

यासंदर्भात ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांनी सांगितले की या युवकांने हें कृत्य का केले याची माहिती घेऊन त्याला सोडून देण्यात येईल. कारण आत्महत्या करणे हा कायद्यात गुन्हा नसल्याने आंम्ही केवळ त्याचे बयान नोंदवून त्याला सोडून देऊ.

# संसदीय आश्वासन समितीचे दौऱ्यात खासदार काळे यांची उपस्थिती

## बैठकीत अनेक महत्वाच्या विषयावर चर्चा




**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०४ जून**

संसदीय आश्वासन समितीच्या तामिळनाडू राज्यातील उटी येथे दि. २७ते २९मे च्या अभ्यास दौऱ्यात खासदार अमर काळे यांनी आश्वासन समिती सदस्य म्हणून उपस्थिती दर्शविली. संसदीय आश्वासन समितीचे तामिलनाडू राज्यातील दौऱ्यात रेल्वे मंत्रालयाच्या प्रतिनिधींशी तसेच रेल्वे मंत्रालया अंतर्गत इंटीग्रल कोच फॅक्टरीच्या प्रतिनिधी सोबत हायड्रोजन ट्रेन टेक्नॉलॉजी बाबत, तामिलनाडू राज्यात आयुर्वेदीक उपचाराचा प्रचार व प्रसार होण्याचे दृष्टीने आयुष वैद्यकीय महाविद्यालय व आयुष संशोधन केंद्र उभारणीबाबत आयुष मंत्रालयाच्या प्रतिनिधी सोबत बैठक झाली.

त्यानंतर आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालया अंतर्गत आरोग्य व कुटूंब कल्याण विभाग यांचेसोबत अल्पवयीन मुलांमध्ये तंबाखूच्या वापरावर निर्बंध घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना व काय नियम असावे, नविन व नविनीकरण उर्जा मंत्रालयाच्या प्रतिनिधीसोबत स्वस्त हरित हायड्रोजन उत्पादन या विषयावर चर्चा झाली. २९मे रोजी संरक्षण मंत्रालयाच्या सैन्य व्यवहार विभागाच्या प्रतिनिधी सोबत सैनिकी शाळांमधील शिक्षकांसाठी पुरस्कार तसेच मेजर व कॅप्टन स्तरावरील अधिकाऱ्यांची असलेली कमतरता व ती दूर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना तसेच देशात सध्या पशूधन विकासाला अतिशय महत्व असून राष्ट्रीय पशूधन मिशन अंतर्गत मच्छीमारी, पशू संवर्धन व दुग्ध व्यवसाय मंत्रालयाच्या (पशू संवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग) प्रतिनिधीसोबत मच्छीमारी व्यवसाय, दुग्ध व्यवसाय या व्यवसायासोबतच पशू संवर्धन विषयावर सविस्तर चर्चा झाली.या अभ्यासदौऱ्यात आश्वासन समितीमध्ये अध्यक्ष वहरेंद्रसिंग मलिक, खासदार अमर काळे यांचेसह अनिल बलुनी, राजकुमार चहर, योगेंद्र चंडोलिया, मो.रकीबुल हुसेन, कनिमोळी करुणानिधी, डॉ. प्रभा मल्लिकार्जुन, रामप्रित मंडळ, खगेन मुर्मू, देवेंद्रसिंग ऊर्फ भोलेसिंग, धरमबीर सिंग,. इ. तुकाराम, खासदार तथा आश्वासन समिती सदस्यांचा समावेश होता.

### टोल नाक्यावरील फसवणूक व भ्रष्टाचार या विषयावर चर्चा

देशात महामार्गाचे जाळे खूप मोठया प्रमाणात असून त्यावरुन असलेली वाहतुक सुकर होण्याकरीता या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती तत्परतेने व्हावी याकरीता ठिकठिकाणी टोलनाके उभारण्यात आलेले आहे. परंतु या टोलनाक्यावर अनेकदा फसवणूक होते.

### आंजी येथील प्रवासी निवा-यासमोरील अतिक्रमण हटवा

## ग्रामस्थांचे जिल्हाधिका-यांना निवेदन

**युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी**
**आंजी(मो), दि. ०४जून** येथील चौकामध्ये प्रवासी निवा-याचे बांधकाम पूर्ण झाले असुन हा प्रवासी निवारा वर्धा-अ र्वी- विरुळ स्थित आहे.प्रवासी निवा-यासमोर व्यावसायीकाने अतिक्रमण केले असुन चहा टपरीच्या नावाखाली या ठिकाणी अवैध व्यवसाय सुरु असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असुन विशेषकरुन महिलांना अडचणींचा सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात नागरिकांनी ग्रामपंचायतला सुचना देण्यात आल्या परंतु त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होत आहे. तरी या जागेवरील अतिक्रमण हटवून सुरु असलेले असलेल्या अवैध व्यावसायावर निर्बंध घालावे अशी मागणी नागरिकांनी जिल्हाधिका-यांना निवेदनातून केली आहे.

बसस्थानकावर प्रवासी निवारा नसल्याने प्रवाश्यांना विशेष करुन महिलांना अडचणींचा सामना करावा लागत असे. ऊन्हात किंवा पावसाळ्यात झाडांचा किंवा दुकानाचा आधार घेऊन उभे रहावे लागत असे. यामुळे प्रवाशी निवारा बांधण्यात आला. परंतु तरीही नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रवासी निवा-याच्या चारही बाजुने रस्ता आहे. या निवा-यासमोर व्यावसायीकाने अतिक्रमण केले असुन चहा टपरीच्या नावाखाली या ठिकाणी अवैध व्यवसाय सुरु असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असुन विशेषकरुन महिलांना अडचणींचा सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात ग्रामपंचायतला माहिती देण्यात आली. परंतु याकडे ग्रामपचायतचे दुर्लक्ष होत असल्याने प्रवाश्यांची गैरसोय होत आहे. करिता प्रवासी निवा-यासमोरील अतिक्रमण हटवून अवैध व्यवसायावर आळा घालावा अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिका-यांनी निवेदनाव्दारे केली आहे. निवेदनाच्या प्रतिलिपी जि.प.मुख्य कार्यकारी अधिका-यांना देण्यात आली.

# उपचारादरम्यान झाला महिलेचा मृत्यू

**वर्धा :** प्रकृती खालावल्याने रुग्णालयात दाखल केलेल्या ३७ वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, ही घटना सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात घडली,

मिळालेल्या माहितीनुसार, रुपाली सुरेश कोल्हे (वय ३७, रा. खैरवाडा) असे मृत महिलेचे नाव आहे, त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केले होते, या प्रकरणी उत्तम तायडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन खरांगणा पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद आहे.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत उत्कृष्ट कामगिरी

### करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि.४ जून**

केंद्र शासनाच्यावतीने आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत गेल्या आर्थिक वर्षात प्रकल्प घटक मंजूरीसाठी उत्कृष्ट काम केलेल्या बँक अधिकाऱ्यांचा जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. केंद्र शासन पुरस्कृत या योजनेंतर्गत सन २०२४-२५ करिता जिल्ह्यास वैयक्तिक लाभार्थी घटकांतर्गत २९१ प्रकल्प मंजुरीचे तसेच गट व सामाईक पायाभूत सुविधा घटकांतर्गत १४ प्रकल्प मंजुरीचे लक्षांक राज्य नोडल एजन्सीद्वारा देण्यात आले होते.

जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया व कृषि विभागाच्या माध्यमातून प्राप्त लक्षांक जिल्ह्यातील सर्व बँकांना वाटप करण्यात आले होते. जिल्हा बँकर्स समितीच्या बैठकीत योजनेंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांचा प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. सत्कार करण्यात आलेल्यांमध्ये सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे रिजनल मॅनेजर धर्मेंद्र कुमार, स्टेट बँक ऑफ इंडियाचे रिजनल मॅनेजर सुधीर कुमार, बँक ऑफ इंडियाचे उप झोनल मॅनेजर जितेंद्र कुमार, बँक ऑफ महाराष्ट्रचे उप झोनल मॅनेजर रवी जैन या बँक अधिकाऱ्यांचा समावेश आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना पाच वर्षाच्या कालावधीकरिता राबविण्यात येत असून सदर योजनेला सन २०२५-२६ पर्यंत एका वर्षाची अतिरिक्त मुदतवाढ देण्यात आली आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे औपचारिकीकरण करणे, स्थानिक रोजगार निर्मिती आणि अन्न उद्योगाला चालना देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेतून वैयक्तिक उद्योजक, स्वयंसेवी संस्था, शेतकरी उत्पादक संघ, सहकारी संस्था आदींना वित्तीय व तांत्रिक मदत दिली जाते. विशेष म्हणजे योजनेंतर्गत वैयक्तिक उद्योजकांना त्यांच्या प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्क्यांपर्यंत, कमाल १० लाख रुपयांपर्यंतचे अनुदान दिले जाते तसेच स्वयंसहायता गट, स्वयंसेवी संस्था, शेतकरी उत्पादक संघ, सहकारी संस्था यांना अनुदानाची कमाल मर्यादा ३ कोटी आहे.

### योजनेंतर्गत जिल्ह्यात ८८१ प्रकल्पांना कर्ज, आतापर्यंत ७०० पेक्षा जास्त उद्योग सुरु

योजना लागू झाल्यापासून जिल्ह्यामध्ये एकूण ८८१ अन्न प्रक्रिया उद्योगांना बँकेकडून कर्ज मंजुरी मिळालेली असून ७०० पेक्षा जास्त उद्योगांचे औपचारीकरण करण्यात आलेले आहे. यामध्ये मसाले उद्योग, दालमिल उद्योग, मिलेट आधारित उत्पादने, बेकरी उद्योग, तेल घाणी उद्योग, धान्य सफाई उद्योग, पापड उद्योग, शेवळी उद्योग, जनावरांचे खाद्य निर्मिती उद्योग, दुध प्रक्रिया उद्योगांचा समावेश आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी या पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात उद्योजकतेला चालना मिळून अन्न प्रक्रिया व्यवसाय तसेच महिला, तरुण आणि पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांना नवसंजीवनी देण्यासाठी ही योजना प्रभावी ठरत आहे, त्यामुळे जिल्ह्यातील सर्व बँक अधिकाऱ्यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेमध्ये सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या. त्याचप्रमाणे अधिकाधिक तरुण, महिला उद्योजक आणि बचत गटांनी या योजनेमध्ये सहभाग घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले यांनी केले आहे.

# रेशीम उद्योगातून केवळ दोन महिन्यात ८४ हजाराचे उत्पन्न

## पिपरी येथील प्रतिक झोडे यांनी शोधला यशाचा मार्ग



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०४जून**

पिपरी येथील प्रतिक झोडे या शेतकऱ्याने पारंपारिक शेतीला बगल देऊन एक एकर शेतीवर तुती लागवड केली. रेशीम उद्योगातुन पहिल्या वर्षी पहिल्याच महिन्यात ६४ किलो कोषाचे उत्पादन घेऊन ३० हजार रुपयाचे व दुसऱ्या महिन्यात १०३ किलो कोष उत्पादन घेऊन ५४ हजार असे दोन महिन्यात एकून ८४ हजार रुपयाचे उत्पन्न मिळविले.

तालुक्यातील पिपरी येथील रहिवासी असलेल्या प्रतिक नामदेवराव झोडे या कृषि पदवीधारक पारंपारिक शेती करणाऱ्या शेतकऱ्याची येळाकेळी येथे दीड एकर शेती आहे. आजपर्यंत ते आई वडील यांच्या सहकार्याने पारंपारीक शेती म्हणजे पराटी, सोयाबीन थोडाफार भाजीपाला ही पीके घेत होते. निसर्गाचा लहरीपणा व बाजारपेठेतील उत्पादीत मालाचे भाव व उत्पादनास येणारा खर्च याचा ताळमेळ बसत नव्हता. कोणती शेती करावी? या विचारात असतानाच झाडगाव येथील शेतकरी विशाल भागडे हे मागील २० वर्षापासून सातत्याने रेशीम शेती करीत आहेत व भरघोस उत्पन्न कमवीत आहे, असे समजले. त्यानुसार कुटुंबासोबत त्यांनी विशाल भागडे यांचे किटक संगोपन चालू असतांना सातत्याने भेट देऊन रेशीम उद्योग समजुन घेतला. रेशीम शेती उद्योग व त्यातून हमखास मिळणाऱ्या उत्पन्न, बाजारपेठ याबाबत त्यांनी माहिती घेतली. त्यानंतर रेशीम कार्यालयास भेट देवून वरिष्ठ तांत्रिक सहायक समुह प्रमुख रजनी बन्सोड यांच्याकडून रेशीम उद्योग व तुती बेणे उपलब्धतेबाबत अधिकची माहिती जाणून घेतली.

प्रतिक झोडे यांनी ऑगष्टमध्ये १ एकर क्षेत्रावर तुती लागवड केली. जुगाड पध्दतीचे कच्चे शेड बांधकाम केले. त्यानंतर मार्च मध्ये १०० अंडीपुंजाची बॅच रेशीम विकास अधिकारी विलास शिंदे व रजनी बन्सोड यांचे सहकार्य व मार्गदर्शनाखाली घेतली. त्यात ६४ किलो कोष उत्पादन होऊन ३० हजार रुपयांचे उत्पन्न मिळविले. त्यानंतर लगेचच १२० अंडीपुंजाची बॅच घेतली व त्यापासुन १०३ किलो कोष उत्पादन होऊन ५४ हजार रुपयांचे उत्पादन मिळविले.

आता आत्मविश्वास वाढल्याने प्रतिक झोडे यांनी पुढील बॅचसाठी १५० अंडीपुंजाची चॉकी बुक केली आहे. त्यानुसार व्यवस्थापन सुरु आहे. पुढील बॅचचे उत्पन्न ९० हजार ते १ लाखापर्यंत होईल, असा आत्मविश्वास व्यक्त केला आहे. झोडे कुटुंबीय परिस्थीतीवर मात करुन अनुदानाची वाट न पाहता आपला आर्थिकस्तर उंचावत आहे, ही बाब कौतुकास्पद व ईतर शेतकऱ्यांनी प्रेरणा घेण्यासारखी आहे, असे मत रेशीम विकास अधिकारी विलास शिंदे यांनी व्यक्त केले. प्रतिक यांच्या कुटुंबामधील आई, वडील व ते स्वतः शेतात काम करतात. २०० अंडीपुंजा पर्यंतची बॅच कुटुंबाचे सहकार्याने घेऊ, असे ते विश्वासाने सांगतात. काळजीपूर्वक कामे केली तर रेशीम उद्योग हा शाश्वत उद्योग असुन नोकरीच्या मागे न लागता हाच उद्योग मी करणार असे मत त्यांनी व्यक्त केले.

तरुण शेतकऱ्यांनी फक्त अनुदान मिळते म्हणून रेशीम उद्योगाकडे पाहू नये तर या उद्योगातुन अल्प कालावधी मध्येच शेतकरी लक्षाधीश होऊ शकतो, असे ते सांगतात.

# शेतकऱ्यांची 'डीएपी' खताच्या नावाखाली अडवणूक, लिंकिंगचा धोका!

## कृषी विभाग कुंभकर्णी झोपेत




**महासागर प्रतिनिधी**
**सेलू, दि. ०४जून**

शेतकऱ्यांची आवश्यक असलेल्या खत आणि बी-बियाण्यांसाठी अडवणूक होत असल्याचे चित्र सध्या बाजारपेठेत निर्माण झाले आहे. अमुक एका खतासाठी तमुक एका प्रकारचेचं खत खरेदी करा, असा हेका कृषी केंद्र चालकांकडून धरला जात असल्याने शेतकरी नाहक भरडला जात आहे. त्यामुळे निद्रावस्थेत असलेल्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे त्वरित लक्ष देत शेतकऱ्यांना खत आणि बी-बियाणे वेळेत उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

शेतकऱ्यांची सध्या पेरणीपूर्व लगबग सुरु आहे. याकरिता आवश्यक असलेली बी-बियाणे, खते आणि कीटकनाशके खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बाजारपेठेत चकरा सुरु आहेत. कृषी केंद्र चालक देखील ह्याच संधीच सोनं करण्यासाठी टपून बसले आहेत. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या खताच्या नावाखाली अन्य प्रकारची खते शेतकऱ्यांच्या माथी मारली जात आहेत. सध्या बाजारात 'डीएपी' नामक खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला गेलायं. या खताच्या मोबदल्यात अन्य खत खरेदी करण्याचा शेतकऱ्यांसमोर हेका धरला जात आहे. शेतकऱ्यांना कृषी हंगामाच्या तोंडावर बी-बियाणे, खते आणि कीटकनाशके उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही कृषी विभागाची आहे. परंतु बऱ्याच कृषी केंद्रात अद्याप खताचा पुरेसा साठा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. ज्यांच्याकडे आहेत ते शेतकऱ्यांची अडवणूक करीत लिंकिंग करण्याचा प्रयत्न करीत आहेत. याकडे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष देत शेतकऱ्यांना खते आणि बी-बियाणे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

### डीएपीऐवजी अन्य खतांसाठी जबरदस्ती

शेतकऱ्याला जर डीएपी खत हवे असेल तर त्याला ते मिळायलाच पाहिजे. परंतु कृषी केंद्र चालक शेतकऱ्यांना जबरदस्तीने डीएपी ऐवजी सुपर फॉस्पेक्ट किंवा पोटॅश खरेदी करण्यासाठी बाध्य करतात. त्यांच्याकडे जर डीएपीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, तर मग ही एकप्रकारे खताची लिंकिंग नाही का? यासंदर्भात आता कृषी विभाग काय भूमिका घेतो, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### अधिकाऱ्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

कृषी केंद्रातून नेमकं काय चाललंय, याकरिता अधिकाऱ्यांची नियुक्ती असते. यासाठी ते दर महिन्याला कृषी केंद्रात नतमस्तक देखील होतात. परंतु या भेटी दरम्यान ते शेतकऱ्यांच्या हिताऐवजी स्वतःचेच हित जोपासत असतात. ऐन पेरणीच्या तोंडावर अशा प्रकारे खतांचा तुटवडा निर्माण झाल्याने अधिकाऱ्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

## आठवडी बाजारातून दुचाकी चोरी

**महासागर प्रतिनिधी वर्धा,दि. ०४ जून**

आठवडी बाजारात गेलेल्या युवकाची दुचाकी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेली, ही घटना २९ मे रोजी इंदिरा मार्केट, हनुमान मंदिर, आर्वी येथे घडली, मिळालेल्या माहितीनुसार, सागर सुधाकर देऊळकर (वय ३५) रा. महादेव वॉर्ड, आर्वी हा एम. एच. ३२ एई. २४०१ क्रमांकाचा दुचाकी वाहनाने आठवडी बाजार घेण्यासाठी गेला होता, दुचाकी मंदिराच्या बाजूला उभी करुन भाजीपाल्याच्या दुकानामध्ये गेला, रात्री ८ वाजता परत आला असता दुचाकी दिसली नाही, त्याने बाजार परिसरात दुचाकीचा शोध घेतला असता मिळून आली नाही, याप्रकरणी सागर देऊळकर यांच्या तक्रारीवरुन तक्रारीवरुन आर्वी पोलीस ठाण्यात आर्वी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरटयाविरुद्ध गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

# बस स्थानकावर चिडीमारीचे प्रकार वाढले

## विद्यार्थिनीमध्ये दहशत, पालक चिंतीत

**महासागर प्रतिनिधी**
**देवळी,दि. ४ जून**



येथील बस स्थानकातील महिला स्वच्छतागृहात मोबाईलद्वारे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याचा प्रकार उघडकीस आला. बस स्थानकावर चिडीमारी करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून याकडे बस स्थानक प्रमुख व पोलीस विभागाचे दुर्लक्ष असल्याने असे प्रकारे घडत आहे. यामुळे विद्यार्थिनींमध्ये दहशत पसरली असून पालकांची चिंता सुद्धा वाढलेली आहे. यावर त्वरित पोलीस विभागाने दखल घेऊन होणारे प्रकार थांबविण्याची नागरिकांनी मागणी केली आहे.

बस स्थानकावर सोमवारी २ जून रोजी विद्यार्थिनी लघुशंकेकरीता स्वच्छतागृहामध्ये गेले असता एमआय डी सी मध्ये काम करणारा परप्रांतीय युवक महिला स्वच्छतागृहामध्ये खिडकीमधून मोबाईलद्वारे चित्रीकरण करत असल्याचे परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यास दिसला असता त्याने बस स्थानक प्रमुखाच्या मदतीने सदर युवकास पकडून चांगला चोप दिला. आणि देवळी पोलीस स्टेशनला झालेल्या प्रकाराची तक्रार देण्यात आली. पण या संदर्भात देवळी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे. पण आरोपी हा अल्पवयीन असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे त्याला बालसुधार गृहामध्ये पाठविण्यात येईल असे सहाय्यक उपपोलीस निरीक्षक ढोनेकर यांनी या विषयी माहिती दिली. आरोपी अंकित भारद्वाज हा औद्योगिक वसाहतीमध्ये एसएम डब्ल्यू इस्पात कारखान्यामध्ये काम करत असल्याचे सांगण्याचे येत आहे. हा युवक सोमवारी सकाळच्या सुमारास बस स्थानकाच्या महिला स्वच्छतागृहात जाणाऱ्या महिला व मुलींचे मोबाईलद्वारे व्हिडिओ शूटिंग करत असल्याचे रंगेहात पकडण्यात आले. औद्योगिक वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये परप्रांतीय युवक कामाला असून हे युवक फावल्यावेळी बसस्थानक व गर्दीच्या ठिकाणावर फिरत राहतात व चिडीमारी करण्याचा नित्य नियम झालेला आहे. सदर घटनेची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल चव्हाण यांना मिळाल्यावर त्यांनी बस स्थानकाची पाहणी केली असून यासंदर्भात काय पाऊल उचलल्या जाते. याकडे पालकांचे व नागरिकांचे लक्ष लागले आहे. या घटनेच्या संदर्भात परिवहन विभागाचे अधिकारी व पुलगाव आगाराचे व्यवस्थापक सुरज बोबडे यांच्यामार्फत नियंत्रक जगदीश ढोबळे यांनी देवळी पोलीस स्टेशनला माहिती दिली असून पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी केली आहे. आरोपी हा अल्पवयीन असल्याचे जरी सांगण्यात येत असले तरी तो अल्पवयीन नसल्याचे त्याच्या शरीरयष्टिवरून दिसून येत आहे. आरोपीची आरोग्य तपासणी करून व तसेच वयाचे दस्तावेज तपासण्यात यावे. जेणेकरून आरोपीचे खरे वय माहित होईल अशी मागणी नागरिकांद्वारे करण्यात येत आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)पक्षाची बैठक

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा,दि. ०४ जून**



जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार )पक्षाची वर्धा विधानसभा बैठक जिल्ह्याचे नवनियुक्त पक्षनिरीक्षक सुरेश गुढधे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि जिल्हाध्यक्ष सुनील राऊत यांच्या अध्यक्षतेत पार पडली.

बैठकीला प्रदेश प्रवक्ता व नागपूर ग्रामीणचे अध्यक्ष प्रवीण कुंटे पाटील , प्रदेश प्रवक्ता नितेश कराळे, माजी पंचायत समिती उपसभापती संदीप किटे, जिल्हा उपाध्यक्ष खलील खतीब व संदीप भांडवलकर, वर्धा विधानसभा अध्यक्ष मिलिंद हिवलेकर, शहराध्यक्ष व माजी नगरसेवक मुन्ना भाऊ झाडे, तालुकाध्यक्ष पंकज घोडमारे, माजी नगराध्यक्ष संतोष ठाकूर, माजी नगरसेवक दीपक आडेपवार, माजी नगरसेविका विभाताई दाते, अल्पसंख्यांकाचे नावेद शेख, माजी किसान सेल अध्यक्ष संजय काकडे, विनोद पांडे व विकास खोडके, संजय इंगळे, युवक जिल्हाध्यक्ष प्रणय कदम ,वर्धा शहर युवक अध्यक्ष अमर देशमुख , शारदा केने, आकाश दाते, कुणाल मोरे यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगर पालिका, नगर पंचायत या निवडणुकांच्या दृष्टीने तालुकानिहाय बैठकांचे आयोजन, प्रत्येक गणात आणि गटात पक्ष बांधणी आणि बैठका घेण्याचे ठरविण्यात आले. प्रास्ताविक विधानसभा अध्यक्ष मिलिंद हिवलेकर यांनी केले.

## स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त योग शिबिर



**महासागर प्रतिनिधी**
**आर्वी,दि. ०४जून**

स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीचे औचित्य साधून परमहंस श्री संत अडकुजी महाराज जन्मभूमी संस्थान, पारसे भवन या ठिकाणी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमांतर्गत स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यात आला. योग प्रशिक्षण मुख्यतः महिलांसाठी आयोजित करण्यात आले होते त्यांना योगाचे धडे देत योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले. प्रशिक्षण डॉ.अंजली कडू यांनी दिले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान साधना पेंडके यांनी भूषविले.

कार्यक्रम यशस्वितेकरिता परमहंस श्री. श्री संत आडकोजी महाराज संस्थानाच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले. आभार वृंदावले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेकरिता सुरेंद्र पारसे यांनी सहभाग घेतला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी

### ३०० दिप प्रज्वलीत करुन ३०० वी जयंती साजरी

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा येथे दि. ०४जून**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक यांच्या त्रिशताब्दीनिमित्त तळेगाव(टा.) येथे छत्रपती शिवाजी महाराज व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन व माल्यार्पण करण्यात आले.याप्रसंगी ३०० दीप प्रज्वलन करून उत्साहात ३०० वी जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी पांडुरंग देशमुख, सुभाष कडे, काशिनाथ पारवे ,धिरज कोपरकर , रेखा सुरकार यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर मार्गदर्शन केले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पांडुरंग देशमुख, बाबाराव निवल , राहुल सुरकार , सुभाष कडे, काशिनाथ पारवे, देविदास सुरकार , विलास मानकर , प्रभाकर वानखेडे, दिनेश हुडे ,उल्हास सुरकार , राहुल कांबळे, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच राजू सुरकार ,राजु सुर्यवंशी, गजानन पारवे, खुशाल पारवे, रवि पारवे, सतिश पारवे, प्रकाश पोराटे , वासुदेव पारवे, रमेश पारवे, किशोर पारवे, आनंदराव पारवे, विजय घोडे , बालकदास कुहिटे , दिनकरराव थोटे, बबनराव थोटे, रामचंद्र पारवे, प्रभाकर घोडे, ज्ञानेश्वर वंजारी, राजेंद्र साव , संतोष पारवे, नामदेव पारवे, बंडुजी पारवे , मनोहर पारवे, शंकर पारवे, सुधाकर वायरे, पुरुषोत्तम वायरे, गजानन वायरे , अतुल पारवे , प्रविण पारवे ,अमोल थोटे, सारंग वायरे , अंकुश थोटे , रविन्द्र वायरे ,अजय देवढे , लिलाधर पोहाणे , संजय पाटील,हरीदास सुरकार , प्रकाश तळवेकर, सुधिर खोंड ,भारती घोडे ', लता पारवे, अरूणा पारवे , सुनिता पारवे, सुमित्रा पारवे, सुनिता कडे, दुर्गा पारवे, वर्षा पारवे, नंदा पारवे, वैशाली पोराटे , सुनंदा पारवे , पुष्पा पारवे, रेखा पारवे, वंदना पारवे, निर्मला पारवे, प्रतिभा कडे, शालु घोडे , माया घोडे, कल्पना कुहिटे , सुमित्रा थोटे, रेखा साळवे, अर्चना पारवे, संगीता पा पारवे , रत्नमाला पारवे, रुपाली घोडे, साक्षी पारवे, अंबिका पारवे, रंजना मरघाडे , रेखा सुरकार , समाज बांधव उपस्थित होते.

## न्यायाधीश व्ही एस. वाघ यांना निरोप



**महासागर प्रतिनिधी**
**कारंजा(घा) , दि. ४ जून**

दिवाणी न्यायालयातील न्यायाधीश व्ही. एस. वाघ यांचा तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असल्याने त्यांची बदली पलटण येथील न्यायालयात झालेली असून येथील अधिवक्ता संघ व कारंजा न्यायालयाच्या संयुक्त विद्यमाने न्यायाधीश व्ही. एस. वाघ यांच्याा निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी त्यांना पुष्पगुच्छ व भेट वस्तु देत त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अधिवक्ता संघ अध्यक्ष ॲड. धारपुरे,ॲड. टोपले, ॲड.पराडकर, ॲड.सावलकर (सरकारी अभियोक्ता ), ॲड. के. टोपले, व न्यायालयीन कर्मचा-यांन विचार व्यक्त करताना न्यायाधीश व्ही. एस. वाघ यांनी सर्वांना न्याय देण्याचे काम केले असून कधीही आरोपी, अधिवकता, व न्यायालयीन कर्मचारी, अधिकारी असा भेदभाव न करता माणुसकी जपत सर्वांना आदर, सन्मानाची वागणूक देऊन सर्वांची मने जिंकत सर्वांच्या मनावर अधिराज्य करणारे व्यक्तिमत्व म्हणजे न्यायाधीश ही. एस. वाघ अशी भावना व्यक्त केली. या प्रसंगी अधिवकता संघ अध्यक्ष ॲड. धारपुरे, ॲड.टोपले, ॲड. पराडकर, ॲड. धांदे, ॲड. एच.एन.धांदे, ॲड. कडवे, ॲड. दुपारे, ॲड.. तहेतवार, ॲड.बागडे, ॲड. गाकरे, ॲड.कठाणे ,ॲड. उकंडे, ॲड. म्हसके, ॲड.मोटवाणी, ॲड. सातपुते, व वरिष्ठ न्यायालय आर्वी अधीक्षक झहीर , कारंजा न्यायालयाचे साहाय्यक अधीक्षक गजभिये, देशमुख, बागडे ,ठाकरे, बोबडे, रामटेके, इंदूरकर, पोतदार, गजरे, डोईजोड, वाडेकर, सारिका मानकर, चव्हान उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संचालन बागडे यांनी करुन आभार देशमुख यांनी मानले.

## प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ४जून.**

शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ, नाविण्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपुर्ण कामगिरी केलेल्या ५ वर्षावरील व १८ वर्षापर्यंतच्या मुलांना केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार दिला जातो. सन २०२५ करिता प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले असून दिनांक ३१ जुलै २०२४ पर्यंत अर्ज स्विकारण्यात येणार आहे.

मुलाचे वय ५ वर्षापेक्षा अधिक व ३१ जुलै २०२४ रोजी १८ वर्षापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ, नाविण्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपुर्ण कामगिरी केलेल्या मुलांना संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहे. पुरस्काराबाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून पुरस्कारासाठी प्रस्ताव स्वत: मुले किंवा त्यांच्यावतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश, जिल्हाधिकारी, जिल्हादंडाधिकारी, पंचायतराज संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आदी अर्ज करु शकतात, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

## महिलेच्या गळयातील सोनसाखळी लंपास

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, ०४ जून**

शतपावली करत असलेल्या महिलेच्या गळयातील सोन्याची चेन दुचाकीवर आलेल्या दोघांनी चेन हिसकावून धूम स्टाईल पळ काढला, ही घटना शिवरामवाडी कारला रस्त्यावर घडली, मिळालेल्या माहितीनुसार, निलम अनिल रेखी(वय ५४, रा. कारला रोड) या त्यांच्या मैत्रिणीसह रात्रीच्या सुमारास शतपावली करीत होत्या, दरम्यान, दुचाकीवर तोंड बांधून आलेल्या दोघांनी मागून येत ३५ हजार रुपयांची सोनसाखळी जबरीने हिसकावून पळ काढला, या प्रकरणी रामनगर पोलिस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली, या माहितीच्या आधारे दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## जि.प.टेंभरी शाळेत उन्हाळी शिबिर



**महासागर प्रतिनिधी**
**आर्वी,दि. ०४जून**

शासन निर्देशानुसार निपूण महाराष्ट्र कार्यक्रमातंर्गत उन्हाळी शिबीर आयोजित करून विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत खंड पडू नये व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढावा, या हेतूने गावातील स्वयंसेवक नेमून उन्हाळी सुट्टीत शासनाने निर्धारित करून दिलेला अभ्यासक्रम विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घ्यायचा होता. येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, टेंभरी शाळेत दोन स्वयंसेविकेची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये शिवानी डफरे व मोना गांडोळे यांची निवड करण्यात आली. दोन्ही स्वयंसेविका कृती आधारित व मनोरंजक पद्धतीने अध्ययन अनुभव देत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून उन्हाळी सुट्टी असताना सुद्धा सर्व विद्यार्थी उन्हाळी वर्गाला हजर असतात. अध्ययन अध्यापनासोबतच मुलं ग्राम स्वच्छता व साफसफाई मध्ये सुद्धा सहभाग घेत आहेत. सदर उपक्रमात मिशन समृद्धीच्या समन्वयक अर्चना लांगडे सहकार्य करीत आहे.



आजचा वाढदिवस
दै. महासागर
परिवारातर्फे शुभेच्छा


सानव कांबळे


निळकंठ पिसे


नितिन शिंदे


संदीप लटारे


विवेक दाते


शितल कुत्तरमारे


प्रदिप खानखोजे


विजय देवतळे


राहुल मून

### निधन वार्ता

**मारोतराव हिवरे**



**वर्धा, :** जिल्हा परिषदेचे माजी कक्ष अधिकारी मारोतराव तुकाराम हिवरे वय (८३) रा. पद्मावती नगर, आलोडी यांचे उपचारादरम्यान सेवाग्राम रुग्णालयात आज दिनांक ४ जून रोजी दुपारी चार वाजता निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा ५ जूनला सकाळी ११ वाजता पद्मावती नगर वर्धा येथुन निघुन अंत्यसंस्कार पवनार येथील मोक्षधामात करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, मुली जावई , व नातवंड असा परिवार आहे.राजु हिवरे यांचे ते वडील होत.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणाला कौशल्याची जोड म्हणजे बा. दे. अभियांत्रिकी – डॉ. पंचारिया

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा,दि. ०४जून**



रोजगारपूरक शिक्षणाची पायाभरणी करणार जिल्ह्यातील पहिलं अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून नावलौकिक असलेल्या बा. दे. अभियांत्रिकीने मागील ४२ वर्षापासून प्रशिक्षित व कुशल अभियंते घडविण्याचा विक्रम केला आहे. मागील ५ वर्षांचा विचार केल्यास तब्बल १६९२ विद्यार्थ्यांनी आपल्या शेवटच्या वर्षातच नामांकित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यात रोजगार मिळवून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला.महाविद्यालय फक्त शैक्षणिक उत्कृष्टता सुनिश्चित करणारे नाही तर उद्योगाच्या मागण्यांसाठी विद्यार्थ्यांना तयार करणारे देखील असल्याची भावना बा.दे.अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. राम पंचारिया यांनी व्यक्त केली.

अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी प्लेसमेंट रेकॉर्ड हा एक महत्त्वाचा निकष आहे आणि या निकषावर बा. दे. अभियांत्रिकी महाविद्यालय हे आज संपूर्ण महाराष्ट्रात सर्वोत्तम अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून गणले जाते.नामांकित कंपन्यानी कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह अंतर्गत आकर्षक पगारावर विद्यार्थ्यांची निवड केली आहे. योग्य व सक्षम विद्यार्थ्यांना विद्यार्थी घडवून त्यांना चांगल्या रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देणे ही बाब महाविद्यालयाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असुन यामूळे विदर्भातील ग्रामिण भागातील शेकडो विद्यार्थी स्वावलंबी होत असल्याचे आनंददायी चित्र निर्माण करण्याचे काम महाविद्यालयाने नेहमीच केले आहे. या वर्षी सुमारे ८५ विद्यार्थ्यांची निवड झाली असून अनेक कंपन्या महाविद्यालयात प्लेसमेंट ड्राईव्ह साठी येण्यास उत्सुक आहेत.विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी कौशल्यांचा मजबूत पाया प्रदान करणाऱ्या सर्वोत्तम अभियांत्रिकी महाविद्यालयातून योग्य शिक्षणाची आवश्यकता आहे. बा. दे अभियांत्रिकी ने कायमच हे सूत्र कायम ठेवल्याने इतक्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची निवड होत असल्याचे मत महाविद्यालयाचे ट्रेनिंग अड प्लेसमेंट अधिकारी डॉ. भूषण लांडे यांनी मांडले आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख, प्राचार्य डॉ. पंचारिया, डॉ. बी. व्ही. लांडे, प्रा. डी. के. भिंगारे, डॉ. एम. जे. शेख, डॉ. सुधीर मोहोड, डॉ. जी. डी. कोरडे,प्रा. ए. बी. डेहने व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी कौतुक केले.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
६६०३२/१९९७
महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट.नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्पलेस हवालदारपूरा वर्धा - ४४२००१ येथे प्रकाशित केले आहे.
संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय मो.नं. ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र देशमुख मो.९०११०५८३७२ (पी.बी.आय. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.

